23/08/2024, 13:46 IMG_20230818_193025 - Sunanda Julme.jpg

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, 370 (CCCLXX)
ISSN : 2278-9308
September 2022

# ग्रेस यांच्या कवितेतील आई

डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे
१५२, नाईक नगर, पोस्ट पार्वती नगर, मानेवाडा रिंग रोड,नागपूर, ४४००२७.

गोषवारा -

मराठी कवितेच्या प्रांतात कवी ग्रेसांच्या कवितेने संगमरवरी सौंदर्य प्राप्त केले आहे. अत्यंत अनवट प्रतिभेचे धनी असलेल्या कवी ग्रेसांची कविता ही रानभूल आहे. त्यांच्या कवितेने झपाटलेले अनेक रसिक, अभ्यासक, चिकित्सक केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण जगभर आढळून येतात. ज्याला ज्याला मराठी कविता आवडते त्याला त्याला ग्रेसांची कविता मोहित करते. तिच्या नादाच्या लहरी रसिक मनाला वेढून घेतात. ग्रेसांच्या कवितेत दुःखाचा अनाहत नाद ऐकू येतो. हे दुःख जाणवते पण भल्याभल्यांना या दुःखाचे आकलन करता येत नाही. या दुःखाबरोबरच ग्रेसांच्या कवितेत उदासी, एकाकीपण, पोरकेपण, तुटलेपण, परात्मभावांचे आवर्तन दिसून येतात. त्यांच्या आईविषयीच्या कविता वेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण असून या कवितेत आढळून येणाऱ्या आईविषयीच्या भावनांशी त्यांच्या दुःखवेदनेची तार जुळते. आईचे गाणे, आई :१, आई : २, आई :३ या तसेच इतर आईविषयक कवितांमधून त्यांच्या आईविषयक शब्दातीत संवेदना आकारास आल्या आहेत. आईचे स्वप्न, तिच्या वाट्याला आलेले दुःख, तिचे संसाराचे ओझे, मुलांना वाटून दिलेल्या वेदना, तिचा विपरीत आचार त्यामुळे कवीला आलेले पोरकेपण या सर्वांचा सार त्यांच्या आईविषयी कवितांमध्ये आहे. म्हणून ग्रेसांच्या आईविषयी कवितांचे आकलन हा अभ्यासविषय मी घेतला आहे.

बीज शब्द -
स्वप्न, दुर्बोधता, संवेदना, प्रतिभा, प्रतिमा, संस्कार, संज्ञाप्रवाह, अनुभूती, अगम्यता इत्यादी.

प्रस्तावना -

ग्रेस यांच्या कवितेत गूढता आहे, दुर्बोधता आहे हे मान्य करूनही ग्रेस आपल्या नेणिवप्रधान अनुभूतीची विलक्षण भासचित्रे काढण्यात यशस्वी ठरले आहेत. त्यांच्या व्हीजन्सला जाणवणारी दिव्यता आपल्याबरोबर शब्द घेऊनच कागदावर उतरते.

'मज कळे न स्वप्न कशाने
सत्याहून सुंदर दिसते
या संध्यासमयि सर्वांची
मग घागर का पाझरते?'

फ्राईडच्या सिद्धांतानुसार कवी, कलावंत दिवास्वप्नात रममाण होतात आणि विलक्षण प्रतिभासामर्थ्याने हे दिवास्वप्नच कलांमधून मांडत असतात. ग्रेसांची दिवास्वप्ने वास्तवाचे नेणिवगत हुंकार आहेत. त्यातला वाच्यार्थ, लक्ष्यार्थ,व्यंगार्थही कळत नसला तरी तिच्यातील प्रतीतिगम्यता वाचकांना सतत खुणावत असते.

वाड्.मयकृती दुर्बोध ठरण्याला जे अनेक घटक कारणीभूत असतात त्यात रसिकनिष्ठ घटकांचाही अंतर्भाव करावा लागतो. त्यामुळे अत्यंत सहानुभूतीने आत्मीयतेने ही कविता समजून घ्यावी लागते, असे ग्रेसांच्या कवितेच्या चाहत्या अभ्यासकांना वाटते. ग्रेसांच्याच म्हणण्यानुसार त्यांची कविता अनुवंशहीन आहे. अनुवंशहीन कविता समजून घेणे सोपे नसते. त्यामुळेच ग्रेसांची अनुवंशहीन कविता समजून घेणे ही रसिकांची कसोटीच ठरणार आहे.



https://drive.google.com/file/d/1ykgBxponTEz3B_f5TmoH_qsRWLjAYxbV/view 1/1